Refer 39271 26869

# MAHARASHTRA ACT No. XLI OF 1965.

AN ACT TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT OF A STATE BOARD AND DIVISIONAL BOARDS TO REGULATE CERTAIN MATTERS PERTAINING TO SECONDARY EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA.

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १३ सप्टेंबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षणासंबंधीच्या विवक्षित बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य मंडळ व विभागीय मंडळे स्थापन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षणासंबंधीच्या विवक्षित बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य मंडळ व विभागीय मंडळे स्थापन करण्यासाठी आणि यापुढे दिलेल्या इतर प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ असे म्हणावे. लघु संज्ञा, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल; आणि ह्या अधिनियमाचे उर्वरित उपबंध हे, राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलात येतील.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "नेमलेला दिवस" या संज्ञेचा अर्थ, कलम १, पोट-कलम (३) अन्वये ह्या अधिनियमाचे उर्वरित उपबंध ज्या तारखेस अंमलात येतील ती तारीख, असा समजावा;

(ब) "मंडळ" या संज्ञेचा अर्थ, राज्य मंडळ किंवा यथास्थिति, विभागीय मंडळ, असा समजावा;

(क) "उप-विधी" या संज्ञेचा अर्थ, राज्य मंडळाने, कलम ३८ अन्वये तयार केलेले उप-विधी, असा समजावा;

(ड) "तत्सम विभागीय मंडळ" या संज्ञेचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाच्या संबंधात, या अधिनियमान्वये पुणे विभागाकरिता स्थापन करण्यात आलेले मंडळ आणि विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संबंधात, नागपूर विभागाकरिता अशा रीतीने स्थापन करण्यात आलेले मंडळ, असा समजावा;

(इ) "विभाग" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या तीन विभागांपैकी प्रत्येक विभागामध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे, असा समजावा;

(फ) "विभागीय मंडळ" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये विभागाकरिता स्थापन केलेले मंडळ, असा समजावा ;

(ग) "अंतिम परीक्षा" या संज्ञेचा अर्थ, राज्य मंडळाच्या वतीने विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी एक किंवा त्याहून अधिक परीक्षा असा समजावा ;

(ह) "मुख्याध्यापक" किंवा "मुख्याध्यापिका" या संज्ञेचा अर्थ, विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळेच्या शिक्षकवर्गाचा प्रमुख असा समजावा, मग त्या पदाचे कोणतही अभिधान असो ;

(आय्) "संस्था" या संज्ञेचा अर्थ, माध्यमिक शिक्षण देणारी संस्था, असा समजावा ;

(ज) "विहित" म्हणजे विनियमांद्वारे विहित केलेले ;

(के) "प्राथमिक शिक्षण" या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारने यासंबंधीत व्याख्या केल्याप्रमाणे प्राथमिक शाळेत दिले जाणारे शिक्षण किंवा त्याच्याशी समतुल्य असलेले शिक्षण, असा समजावा ;

(ल) माध्यमिक शाळेच्या संदर्भात, "विभागीय मंडळाने मान्यता दिलेली" या संज्ञेचा अर्थ, त्या मंडळाचे विशेषाधिकार प्रदान करण्याच्या प्रयोजनांसाठी विभागीय मंडळाने मान्यता दिलेली, आणि "शिक्षण विभागाने मान्यता दिलेली" या संज्ञेचा अर्थ, माध्यमिक शाळा संहिते अन्वये, एकतर शिक्षण संचालनालयाने किंवा तांत्रिक शिक्षण संचालनालयाने मान्यता दिलेली, असा समजावा, आणि "मान्यता" या संज्ञेचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार व समानार्थी शब्दप्रयोग यांचा त्यानुसार अर्थ लावण्यात येईल ;

(म) "विनियम" या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारने, कलम ३७ अन्वये केलेले आणि राज्य मंडळाने कलम ३६ अन्वये केलेले विनियम, असा समजावा ;

(न) "महसूल विभाग" या संज्ञेचा अर्थ, संबंधित जमीन महसूल संहिता किंवा अधिनियम या अन्वये स्थापन करण्यात आलेला मुंबई महसूल विभाग, पुणे महसूल विभाग, नागपूर महसूल विभाग किंवा यथास्थिति, औरंगाबाद महसूल विभाग, असा समजावा, आणि मुंबई महसूल विभागामध्ये बृहन्मुंबईचा समावेश असेल आणि नागपूर महसूल विभागामध्ये राजुरा जिल्ह्याचा समावेश असेल;

(ओ) "माध्यमिक शिक्षण" या संज्ञेचा अर्थ, किशोरावस्थेच्या कालाच्या व सामाजिक जीवनाच्या गरजांच्या पूर्ततेसाठी योजिलेले आणि प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्याच्या लगच नंतर आणि भारतात विधी अन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठांकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या टप्प्याच्या निकटपूर्वी देण्यात येणारे सर्वसाधारण, तांत्रिक, व्यावसायिक किंवा विशेष शिक्षण, (त्याच्या कोणत्याही एकत्रित अभ्यासक्रमासह), असा समजावा;

(प) "राज्य मंडळ" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, असा समजावा;

(क्यू) "शिक्षक" या संज्ञेचा अर्थ, विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळेच्या (मुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापिका यांच्याव्यतिरिक्त) शिक्षकवर्गातील इसम, असा समजावा;

(र) "पाठ्यपुस्तक" या संज्ञेचा अर्थ, अंतिम परीक्षेच्या संबंधात, राज्य मंडळाने त्या परीक्षेसाठी उपयोग करण्याकरिता विहित केलेले किंवा शिफारस केलेले किंवा अन्यथा मंजूर केलेले कोणतेही पुस्तक, आणि विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळेमध्ये घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही इतर परीक्षेच्या संबंधात, राज्य मंडळाने अशा परीक्षेसाठी उपयोग करण्याकरिता मंजूर केलेले कोणतेही पुस्तक, असा समजावा.

३. (१) राज्य सरकारने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, सबंध राज्याकरिता " महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ " या नावाचे एक मंडळ स्थापन केले पाहिजे. — राज्य आणि विभागीय मंडळांची स्थापना.

(२) राज्य सरकारने, तशाच प्रकारे, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीन विभागांपैकी प्रत्येक विभागासाठी अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाचे एक मंडळ स्थापन केले पाहिजे.

४. राज्य मंडळ हे, वर नमूद केलेल्या नावाची एक एकव्यक्तिभूत संस्था असेल आणि त्याची परंपरा अखंड असेल, व त्याचा एक सामाईक शिक्का असेल, आणि त्यास मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल, आणि त्यास उक्त नावाने दावा लावता येईल तसेच त्या नावाने त्याजवर दावा लावता येईल. — राज्य मंडळाची एकव्यक्तिभूत संस्था बनविणे.

५. (१) राज्य मंडळात, राज्य सरकारने नियुक्त केलेला एक सभापती, आणि पुढील सदस्य यांचा समावेश असेल:— — राज्य मंडळाची रचना.

वर्ग अ—पदसिद्ध सदस्य.

(एक) शिक्षण संचालक, किंवा राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेला शिक्षण विभागाचा कोणताही इतर अधिकारी.
(दोन) विभागीय मंडळांचे सभापती.
(तीन) तंत्र शिक्षण संचालक, किंवा राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेला तंत्र शिक्षण विभागाचा कोणताही इतर अधिकारी.
(चार) कृषि संचालक, किंवा राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेला कृषि विभागाचा कोणताही इतर अधिकारी.
(पाच) राज्य शिक्षण संस्थेचा प्राचार्य.
(सहा) राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेली एक कन्याशाळा निरीक्षिका.
(सात) राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेला एक शिक्षण निरीक्षक किंवा जिल्हा परिषदेचा परिषद शिक्षण अधिकारी.

वर्ग ब—निवडून दिलेले सदस्य.

(एक) राज्यात विधी अन्वये स्थापन केलेल्या प्रत्येक विद्यापीठामधून एक सदस्य, असा सदस्य, त्या विद्यापीठाच्या विद्या परिषदेने किंवा इतर प्राधिकरणाने, विभागीय मंडळाचा सदस्य म्हणून निवडून दिलेला असला पाहिजे, आणि प्रथमतः अशी निवडणूक घेण्यात येईपर्यंत त्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विभागीय मंडळावर नामनिर्दिष्ट केलेला इसम (कोणताही असल्यास).
(दोन) महाराष्ट्र विधानसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले दोन सदस्य.
(तीन) महाराष्ट्र विधानपरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेला एक सदस्य.

वर्ग क—नामनिर्दिष्ट सदस्य.

(एक) विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात आलेले मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका यांच्यामधून प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेले चार सदस्य.
(दोन) विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षकांमधून प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे, राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेले [illegible] सदस्य.
(तीन) राज्यातील माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालयांच्या प्राचार्यांमधून राज्य सरकारने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य.
(चार) विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापक मंडळांच्या प्रतिनिधींमधून, प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे, राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेले चार सदस्य.
(पाच) माध्यमिक शिक्षणाशी संबंधित असलेल्या गोष्टींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असल्याच्या कारणास्तव नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विभागीय मंडळाच्या सदस्यांमधून, प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे, राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेले चार सदस्य, त्यांपैकी

निदान एक तरी स्त्री-सदस्य असेल आणि विभागीय मंडळाच्या अशा सदस्यांमधे स्त्री-सदस्य नसेल तर, राज्य सरकारने, त्याच्या मते ज्या स्त्रीस असे विशेष ज्ञान किंवा अनुभव आहे अशा एका स्त्रीस अतिरिक्त सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट केले पाहिजे.

(सहा) राज्य सरकारच्या मते, ज्या इसमांना प्राथमिक शिक्षणाशी संबंधित असलेल्या गोष्टींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा इसमांमधून राज्य सरकारने नामानिर्दिष्ट केलेले दोन सदस्य.

(सात) जिल्हा परिषदांच्या शिक्षण समित्यांच्या सभापतींमधून चार सदस्य, असे इसम विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट केलेले असले पाहिजेत :

परंतु, एखादा इसम, जिच्या सदस्यांनी त्यास निवडून दिले आहे अशा विद्या परिषदेचा, प्राधिकरणाचा, विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल तर, किंवा तो मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षक किंवा माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा व्यवस्थापक मंडळाचा प्रतिनिधी किंवा शिक्षण समितीचा सभापती असण्याचे बंद होईल व त्यास अशा इसमांमधून नामनिर्दिष्ट किंवा नामोद्दिष्ट केलेले असेल तर, तो इसम मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल.

(२) राज्य मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी निवडून आलेल्या किंवा नामनिर्दिष्ट किंवा नामोद्दिष्ट करण्यात आलेल्या (पदसिद्ध सदस्य नसलेल्या) सदस्यांची नावे त्या मंडळाने राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजेत.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, राज्य मंडळाची प्रथमतः रचना करण्यात आल्यावर, राज्य सरकारला, वर्ग ब, परिच्छेद (दोन) व (तीन) अन्वये निवडून द्यावयाचे सर्व किंवा कोणतेही सदस्य-सुद्धा नामनिर्दिष्ट करता येतील ; परंतु, अशा वाबतीत, अशा रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्याने, निवडून देणाऱ्या मंडळाने त्या पदावरील सदस्य योग्य रीतीने निवडून दिल्यावरोवर ते पद रिकामे केले पाहिजे. अशा रीतीने निवडून आलेला सदस्य त्यानंतर पदावधीच्या केवळ उर्वरित मुदतीपर्यंतच पद धारण करील.

विभागीय मंडळांची रचना.

६. (१) विभागीय मंडळात, राज्य सरकारने नियुक्त केलेला एक सभापती, आणि पुढील सदस्य यांचा समावेश असेल—

### वर्ग १—पदसिद्ध सदस्य.

(एक) विभागातील सर्व प्रादेशिक शिक्षण उप-संचालक.

(दोन) परिषद शिक्षण अधिकारी म्हणून विभागामध्ये सेवा करीत असलेले जिल्हा परिषदांचे अधिकारी, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई आणि कन्याशाळा निरीक्षिका यांच्यामधून राज्य सरकारने नामोद्दिष्ट केलेले दोन शिक्षण अधिकारी.

### वर्ग २—निवडून दिलेले सदस्य.

विधी अन्वये स्थापन करण्यात आलेल्या त्या विभागातील प्रत्येक विद्यापीठामधून त्या विद्यापीठाच्या विद्या परिषदेने, आणि विद्यापीठात अशी विद्या परिषद नसल्यास, राज्य सरकार अशा विद्यापीठाच्या ज्या प्राधिकरणास नामोद्दिष्ट करील त्या प्राधिकरणाने, यथास्थिति, अशा विद्या परिषदेच्या किंवा अशा प्राधिकरणाच्या सदस्यांमधून निवडून द्यावयाचा एक सदस्य.

### वर्ग ३—नामनिर्दिष्ट केलेले सदस्य.

(एक) राज्य सरकारने, प्रत्येक महसूल विभागातील मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका यांच्यामधून, नामनिर्दिष्ट केलेले त्या विभागातील तीन सदस्य.

(दोन) राज्य सरकारने प्रत्येक महसूल विभागातील शिक्षकांमधून नामनिर्दिष्ट केलेले त्या विभागातील दोन सदस्य.

(तीन) राज्य सरकारने प्रत्येक महसूल विभागातील माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालयांच्या प्राचार्यांमधून नामनिर्दिष्ट केलेला त्या विभागातील एक सदस्य ;

(चार) राज्य सरकारने विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या प्रत्येक महसूल विभागातील माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापक मंडळांच्या प्रतिनिधींमधून नामनिर्दिष्ट केलेले त्या विभागातील दोन सदस्य ;

(पाच) राज्य सरकारच्या मते, ज्यांना, माध्यमिक शिक्षणाशी संबंधित असलेल्या गोष्टींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा इसमांमधून राज्य सरकारने नामनिर्दिष्ट केलेले प्रत्येक महसूल विभागातील (मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका व शिक्षक यांव्यतिरिक्त) दोन सदस्य ;

(सहा) राज्य सरकारने प्रत्येक महसूल विभागातील जिल्हा परिषदांच्या शिक्षण समित्यांच्या सभापतींमधून नामनिर्दिष्ट केलेला त्या विभागातील एक सदस्य :

परंतु, एखादा इसम, जिच्या सदस्यांनी त्यास निवडून दिले आहे अशा विद्या परिषदेचा किंवा प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल तर, किंवा तो मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका किंवा शिक्षक किंवा माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा व्यवस्थापक मंडळाचा प्रतिनिधी किंवा शिक्षण समितीचा सभापती असण्याचे बंद होईल व त्यास अशा इसमांमधून नामनिर्दिष्ट केलेले असेल तर, तो इसम मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल.

(२) विभागीय मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी निवडून देण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या (पदसिद्ध सदस्य नसलेल्या) सदस्यांची नावे राज्य मंडळाने राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजेत.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, विभागीय मंडळाची प्रथमतः रचना करण्यात आल्यावर, राज्य सरकारला, वर्ग २ अन्वये निवडून द्यावयाचे सर्व किंवा कोणतेही सदस्यसुद्धा नामनिर्दिष्ट करता येतील ; परंतु अशा बाबतीत, अशा रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्याने, निवडून देणाऱ्या मंडळाने त्या पदावरील सदस्य योग्य रीतीने निवडून दिल्याबरोबर ते पद रिकामे केले पाहिजे. अशा रीतीने निवडून आलेला सदस्य त्यानंतर पदावधीच्या केवळ उर्वरित मुदती-पर्यंतच पद धारण करील.

**मंडळांच्या सभापतींच्या पदाची मुदत व सेवेच्या शर्ती.**

७. (१) राज्य मंडळाचा सभापती आणि विभागीय मंडळाचा सभापती हे, त्यांच्या नेमणुकीच्या तारखेपासून चार वर्षांच्या मुदतीपर्यंत पद धारण करतील.

(२) राज्य सरकारला, सभापतीच्या पदाची मुदत वेळोवेळी वाढविता येईल, मात्र अशी मुदत एकूण आठ वर्षांहून अधिक असता कामा नये.

(३) राज्य मंडळाचा सभापती आणि विभागीय मंडळांचे सभापती हे राज्य सरकारचे कर्मचारी असतील आणि त्यांना आपले वेतन व भत्ते राज्याच्या संचित निधीमधून मिळतील. सभापतींचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती ह्या राज्य सरकारकडून ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) जेव्हा रजेमुळे, आजारीपणामुळे किंवा इतर कारणामुळे सभापतीचे पद तात्पुरते रिकामे झाले असेल तेव्हा, राज्य सरकारला दुसऱ्या इसमाची सभापती म्हणून नेमणूक करता येईल ; अशा सभापतीचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती राज्य सरकार ठरवील अशा असतील.

**मंडळांच्या सदस्यांच्या पदाची मुदत व त्यांचे भत्ते.**

८. (१) राज्य मंडळाचे व विभागीय मंडळांपैकी प्रत्येक मंडळाचे, पदसिद्ध सदस्य नसलेले सदस्य हे, ज्या तारखेस त्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील त्या तारखेपासून चार वर्षांच्या मुदतीपर्यंत पद धारण करतील :

परंतु, निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या पदाची मुदत ही, त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे ज्या तारखेस राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असतील त्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंत चालू राहील व त्या तारखेस संपेल.

(२) सदस्यांना, राज्य मंडळाने केलेल्या उप-विधी अन्वये ठरविण्यात येईल असा भरपाई भत्ता

सभापती व सदस्य यांची अपात्रता.

९. पुढील बाबतीत कोणताही इसम हा, राज्य मंडळाचा आणि विभागीय मंडळाचा किंवा ह्या अधिनियमान्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही समितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून नेमला जाण्यास, निवडून येण्यास, नामनिर्दिष्ट किंवा नामोद्दिष्ट केला जाण्यास किंवा असा सभापती किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल—

(अ) त्याचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारांमार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या,—

(एक) प्रकाशित झालेल्या कोणत्याही पाठयपुस्तकात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे किंवा होता, किंवा

(दोन) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या आदेशांवरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात त्याचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे:

परंतु, उप-खंड (एक) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही पाठयपुस्तकात ज्याचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध होता अशा इसमास, अशा पाठयपुस्तकांच्या प्रकाशनांच्या तारखेपासून पाच वर्षांचा अवधी लोटला असेल तर, उक्त उप-खंडान्वये त्या इसमास ती अपात्रता प्राप्त झाली असल्याचे समजता कामा नये;

(ब) ज्याच्याविरुद्ध कलम १५, पोट-कलम (१) अन्वये पदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला आहे असा तो इसम आहे:

परंतु, ज्या इसमाविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल तो इसम, त्याला पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या तारखेपासून पाच वर्षांचा (किंवा राज्य सरकार निर्दिष्ट करील असा त्याहून कमी) अवधी लोटला असेल तर, ह्या खंडान्वये अपात्र असल्याचे समजता कामा नये.

स्पष्टीकरण.—खंड (अ), उप-खंड (एक) च्या प्रयोजनांकरिता—

(अ) पाठयपुस्तकाच्या प्रकाशनामध्ये त्याच्या पुनर्प्रकाशनाचा समावेश होतो;

(ब) एखाद्या इसमाचा अशा पाठयपुस्तकाच्या प्रकाशकाच्या धंद्यात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर त्या कारणावरून त्यास अपात्रता प्राप्त झाली आहे असे समजले पाहिजे.

अपात्रतेमुळे सभापतीची किंवा सदस्याची जागा रिकामी होणे.

१०. जर, राज्य मंडळाचा किंवा विभागीय मंडळाचा किंवा कोणत्याही समितीचा सभापती किंवा सदस्य हा, निकटपूर्ववर्ती कलमात नमूद केलेल्या अपात्रतांपैकी कोणत्याही अपात्रतेस अधीन झाला असेल तर, त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल.

परवानगी-शिवाय गैरहजर राहिल्यामुळे सदस्याची जागा रिकामी होणे.

११. राज्य मंडळावर किंवा विभागीय मंडळावर निवडून आलेला, किंवा नामनिर्दिष्ट केलेला किंवा नामोद्दिष्ट केलेला एखादा सदस्य, मंडळाच्या परवानगीशिवाय मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहील तर, त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल.

रिकाम्या जागेच्या बाबतीतील विवादावरील निर्णय.

१२. कलम १० किंवा ११ अन्वये सभापतीचे किंवा सदस्याचे पद रिकामे झाले आहे किंवा काय, याविषयी कोणताही विवाद उद्भवल्यास, तो विवाद, राज्य सरकारच्या निर्णयासाठी पाठविण्यात आला पाहिजे व त्याचा निर्णय अंतिम असेल.

१३. कलम १० किंवा ११ अन्वये कोणतीही जागा रिकामी झाल्यास, राज्य मंडळाने ती जागा रिकामी झाल्याचे राजपत्रात अधिसूचित केले पाहिजे. जागा रिकामी झाल्याचे अधिसूचित करणे.

१४. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या पदसिद्ध नसलेल्या सदस्यास सभापतीकडे लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल; आणि असा राजीनामा सभापतीस मिळाल्यावरोबर अशा सदस्याने आपले पद रिकामे केले आहे असे समजले पाहिजे. मंडळाच्या सदस्याचा राजीनामा.

१५. (१) राज्य मंडळाचा किंवा विभागीय मंडळाचा किंवा कोणत्याही मंडळाच्या समितीचा कोणताही सदस्य यास, मंडळाच्या मते, ज्यामुळे सदस्य म्हणून (चालू) राहण्यास तो अपात्र ठरेल अशा, नैतिक अधःपाताचा ज्यात अंतर्भाव होतो अशा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल किंवा तो कोणत्याही निंदास्पद वर्तनाबद्दल दोषी असेल तर, राज्य सरकाला संबंधित मंडळाच्या शिफारशीवरून आणि राज्य सरकारला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी, कोणतीही असल्यास, केल्यानंतर, त्यास पदावरून काढून टाकता येईल : कोणत्याही सदस्यास पदावरून काढून टाकणे.

परंतु, ती शिफारस ज्या सदस्यासंबंधी असेल, त्या सदस्यास, अशी शिफारस का करण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, मंडळाने अशी कोणतीही शिफारस करता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्या सदस्यास पदावरून काढून टाकण्यात आले असेल अशा कोणत्याही सदस्याचे नाव राज्य मंडळाने राजपत्रात प्रसिद्ध केले पाहिजे.

१६. (१) राज्य मंडळाने व प्रत्येक विभागीय मंडळाने वर्षातून निदान दोन वेळा तरी सभा भरविल्या पाहिजेत, आणि लागोपाठच्या दोन सभांमध्ये सहा महिन्यांचे अंतर असता कामा नये. मंडळांच्या सभा.

(२) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या सभापतीस, कोणत्याही वेळी मंडळाची विशेष सभा बोलाविता येईल आणि (पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त) मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, सभापतीला अशी विनंती मिळाल्याच्या तारखेपासून एकवीस दिवसांपेक्षा नंतरची नसेल अशा तारखेस त्याने मंडळाची विशेष सभा बोलाविली पाहिजे.

१७. मंडळाच्या सभेपुढे किंवा त्याच्या समितीच्या सभेपुढे, मंडळाच्या मते जो इसम शिक्षण क्षेत्रात तज्ज्ञ असेल अशा कोणत्याही इसमाचा किंवा (राज्य सरकारच्या पुढील अधिकाऱ्यांचा किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा) ज्याच्याशी संबंध असेल असा एखादा विषय चर्चेसाठी किंवा विचारासाठी येण्याचा संभव असेल किंवा येणार असेल तर, मंडळास, अशा तज्ज्ञास किंवा राज्य सरकारच्या (अशा पुढील अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्यास) किंवा राज्य सरकारच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास त्याच्या सभेस उपस्थित राहण्याची विनंती करता येईल :— तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना सभेस बोलाविण्याचा अधिकार.

(एक) कला शिक्षण संचालक ;
(दोन) आरोग्य संचालक ;
(तीन) सेवायोजन संचालक ;
(चार) व्यवसाय मार्गदर्शन संस्थेचे प्राचार्य ;
(पाच) दृक् शिक्षण निरीक्षक ;
(सहा) राज्य शारीरिक शिक्षण निरीक्षक ;
(सात) वाणिज्य शाळांचे निरीक्षक ;
(आठ) राष्ट्रीय छात्र सेना संचालक ;)

राज्य मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

१८. ह्या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून राज्य मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) सर्वसाधारणपणे माध्यमिक शिक्षणाच्या संबंधात, धोरणविषयक बाबतीत आणि विशेषेकरून पुढील बाबतीत राज्य सरकारला सल्ला देणे:—

(एक) माध्यमिक शिक्षणाची समान पद्धत राखणे ;

(दोन) माध्यमिक शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा समान राखणे ;

(तीन) माध्यमिक शिक्षणात, राष्ट्रीय धोरणे व राज्याची धोरणे यांचा समन्वय करणे.

(चार) माध्यमिक शिक्षण, विद्यापीठातील शिक्षण, आणि प्राथमिक व मूलोद्योग शिक्षण यांचा समन्वय करणे ;

(ब) संपूर्ण माध्यमिक शिक्षणक्रमासाठी पाठ्यक्रम व अभ्यासक्रम ठरविण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे ; शेवटच्या वर्गाखेरीज सर्व वर्गांकरिता विभागीय मंडळांनी तयार केलेले तपशीलवार पाठ्यक्रम मंजूर करणे आणि अंतिम परीक्षेसाठी अभ्यासक्रम व तपशीलवार पाठ्यक्रम निश्चित करणे ;

(क) राज्य मंडळाच्या संजुरीसाठी, विभागीय मंडळांनी पाठ्यपुस्तकांची शिफारस करण्यासाठी सर्वसाधारण तत्त्वे ठरविणे, आणि राज्य सरकारास लादणे योग्य वाटतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांस अधीन राहून, विभागीय मंडळांनी शिफारस केलेल्या पुस्तकांतून अशी पुस्तके मंजूर करणे;

(ड) शिक्षकवर्ग, इमारती, फर्निचर, साधने, लेखनसामुग्री, आणि माध्यमिक शाळांना आवश्यक असणाऱ्या इतर गोष्टी यांच्या बाबतीत प्रमाणभूत गरजा विहित करणे ;

(इ) अंतिम परीक्षेसाठी ज्या इयत्तांमधून तयारी करण्यात येते त्या इयत्तांकरिता पाठ्यपुस्तके नेमणे आणि तयार करणे ;

(फ) सर्वसाधारण आणि खाजगी रीत्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना, अंतिम परीक्षेसाठी प्रवेश देण्याकरिता शर्ती विहित करणे ;

(ग) अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देणे ;

(ह) शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे, आणि इतर पारितोषिके सुरू करणे व देणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे ;

(आय्) मृत्युपत्रदाने, देणग्या, दाने, विश्वस्त व्यवस्था, आणि त्यांतील कोणत्याही मालमत्तेची किंवा त्यांतील हितसंबंधाची किंवा त्यांतील हक्काची इतर हस्तांतरणे स्वीकारणे ;

(जे) वरील खंड (आय्) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे व त्यांचा व्यवहार करणे ;

(के) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळांकडून विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे व ती घेणे ;

(ल) माध्यमिक शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा कायम राखला जात असल्याबद्दल खात्री करून घेण्यासाठी शिक्षण संचालक किंवा शिक्षण विभागाच्या इतर अधिकाऱ्यांकडून खास अहवाल व माहिती मागविणे आणि विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळेकडून कोणतीही माहिती मागविणे ;

(म) विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, नैतिक व सामाजिक कल्याणाच्या संवर्धनासाठी उपाययोजनांची शिफारस करणे आणि विद्यार्थ्यांचे निवासस्थान व शिस्त यांच्या शर्ती विहित करणे ;

(न) राज्य मंडळाच्या कार्यालयात आणि विभागीय मंडळाच्या कार्यालयात (सभापती, सचिव, सहसचिव किंवा सहाय्यक सचिव वगळून) त्याचे अधिकारी व सेवक यांची नेमणूक करणे आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे नियमन करणे ;

(ओ) राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या फायद्यासाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे ;

(प) (विभागीय मंडळाची वार्षिक वित्तीय अंदाजपत्रके सोडून) वार्षिक वित्तीय अंदाजपत्रके संमत करणे आणि वार्षिक अंदाजपत्रकाच्या मंजुरीसाठी राज्य सरकारकडे शिफारशी करणे ;

(क्यू) विभागीय मंडळाच्या कामकाजाची सर्वसाधारणपणे तपासणी करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्या मंडळाच्या हिशोबांची मुदतीमुदतीने तपासणी करणे ;

(र) अभ्यासक्रमाचे व शिक्षण देण्याच्या व परीक्षेच्या पद्धतीचे मूल्यांकन करण्याच्या व तीत सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी सांख्यिकीय व अन्य संशोधन करणे ;

(सं) ह्या अधिनियमान्वये (राज्य मंडळाची) कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे ;

(ट) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी विनियम करणे ;

(यू) राज्य मंडळ आणि विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यरीती, मंडळाच्या व समित्यांच्या सदस्यांनी घ्यावयाचा भरपाई भत्ता आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमान्वये जिची तरतूद करण्यात आली नसेल अशी केवळ, राज्य मंडळ विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांच्याच संबंधातील कोणतीही इतर बाब, यांच्या बाबतीत उप-विधी तयार करणे ;

(व्ही) ह्या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास प्रदान करण्यात येतील असे इतर अधिकार चालविणे किंवा लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(डब्ल्यू) ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता आवश्यक असतील अशी सर्व कृत्ये व गोष्टी करणे.

१९. ह्या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, विभागीय मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :— विभागीय मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

(अ) माध्यमिक शाळांमधील प्रमाणभूत गरजांच्या बाबतीत राज्य मंडळाने केलेल्या शिफारशी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी त्याजकडे पाठविण्यात आलेल्या विभागीय महत्त्वाच्या बाबींच्या संबंधात, किंवा स्वतः होऊन सादर केलेल्या विभागीय महत्त्वाच्या बाबींवर राज्य मंडळाला सल्ला देणे ;

(ब) राज्य मंडळाने तयार केलेल्या व घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या व स्थूल रूपरेषांच्या आधारावर अंतिम वर्गाखेरीज, सर्व वर्गांसाठी राज्य मंडळाच्या विचारार्थ, तपशीलवार पाठ्यक्रम तयार करणे, आणि अंतिम परीक्षेच्या पाठ्यक्रमासाठी सूचना करणे ;

(क) अंतिम वर्गाखेरीज, सर्व वर्गांसाठी पाठ्यपुस्तकांच्या मंजुरीसाठी राज्य मंडळाकडे शिफारस करणे ;

(ड) अंतिम परीक्षेस प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे व ती घेणे ;

(इ) वार्षिक वित्तीय विवरणपत्रक तयार करणे व राज्य मंडळाच्या अर्थसंकल्पात त्याचा अंतर्भाव केल्यानंतर राज्य सरकारला सादर करण्यासाठी ते राज्य मंडळाकडे पाठविणे ;

(फ) आपल्या क्षेत्राधिकाराच्या कक्षेतील क्षेत्रात राज्य मंडळाच्या वतीने अंतिम परीक्षा घेणे ;

(ग) त्याच्या क्षेत्राधिकाराच्या कक्षेतील क्षेत्रात अंतिम परीक्षा घेण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि निकाल तयार करण्यासाठी आणि प्रसिद्ध करण्यासाठी, प्राश्निक, अनुवादक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि आवश्यक असेल असा इतर कर्मचारी-वर्ग नेमणे ;

(ह) राज्य मंडळाने याबाबतीत केलेल्या विनियमांस अनुसरून अंतिम परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे ;

(आय) त्याच्याकडून घेण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेसाठी त्याच्या अधिकारक्षेत्रात केंद्रे उघडणे ;

(ज) त्याच्याकडून घेण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करणे ;

(के) शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, पारितोषिके व इतर बक्षिसे देणाच्या प्रयोजनांसाठी राज्य मंडळाकडे, गुणानुसार विद्यार्थ्यांची एक यादी सादर करणे ;

(ल) ज्यात गैरवाजवी मार्गाचा वापर करण्यात आला असेल अशा बाबतीत, राज्य मंडळाने घालून दिलेल्या कार्यरीतीस अनुसरून कारवाई करणे ;

(म) अंतिम परीक्षा वगळून माध्यमिक शाळांतील सर्व परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या तयारीचे सर्वसाधारणपणे मूल्यांकन करणे व त्याबाबतीत राज्य मंडळाकडे आवश्यक त्या शिफारशी करणे ;

(न) विहित केलेल्या रीतीने माध्यमिक शाळांना मान्यता देणे किंवा ती काढून घेणे ;

(ओ) शैक्षणिक दर्जा कायम राखण्यासाठी, त्याने मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळेकडून कोणतीही माहिती मागविणे आणि राज्य मंडळाने दिलेल्या आदेशावरून किंवा स्वतः होऊन, संबंधित विभागीय शिक्षण उप-संचालकाकडून, विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या ज्या माध्यमिक शाळा आवश्यक तो शैक्षणिक दर्जा कायम ठेवीत नसतील अशा माध्यमिक शाळांबाबत खास अहवाल व माहिती मागविणे, त्याने दिलेली मान्यता काढून घेणे, असमाधानकारक शैक्षणिक निकाल व गंभीर स्वरूपाच्या शैक्षणिक अनियमिततेच्या बाबतीत माध्यमिक शाळांच्या संहिते अन्वये देण्यात आलेली मान्यतादेखील काढून घेण्याची, शिक्षण संचालनालयाकडे किंवा यथास्थिति, तांत्रिक शिक्षण संचालनालयाकडे शिफारस करणे ;

(प) त्याच्या समित्यांच्या शिफारशी आपल्या शेऱ्यांसह राज्य मंडळाकडे आवश्यक त्या कारवाईसाठी सादर करणे ;

(क्यू) त्याने मान्यता दिलेल्या संस्थांना व शिक्षण विभागास अंतिम परीक्षा घेण्याच्या कामात सहकार्य देण्यास भाग पाडणे ;

(र) राज्य मंडळाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील असे इतर अधिकार चालविणे.

मंडळांच्या सभापतींचे अधिकार व कर्तव्ये.

२०. (१) ह्या अधिनियमाचे उपबंध व तदन्वये करण्यात आलेले विनियम व उपविधी यांचे निष्ठापूर्वक पालन करण्याची व्यवस्था करणे हे राज्य मंडळाच्या व प्रत्येक विभागीय मंडळाच्या सभापतीचे कर्तव्य असेल व त्यास ह्या प्रयोजनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(२) कोणत्याही निकडीच्या प्रसंगी तावडतोब कारवाई करण्यात आली पाहिजे असे राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या सभापतीचे मत असेल तर, त्याने, त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई केली पाहिजे आणि त्याने आपण केलेल्या कारवाईचे प्रतिवृत्त मंडळास त्याच्या लगत पुढील सभेत सादर केले पाहिजे.

(३) प्रत्येक सभापतीने विहित करण्यात येतील असे इतर अधिकार चालविले पाहिजेत व अशी इतर कर्तव्ये बजाविली पाहिजेत.

सचिव, सह-सचिव व सहायक सचिव यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

२१. (१) राज्य मंडळाचा व प्रत्येक विभागीय मंडळाचा एक सचिव असेल व त्याची नेमणूक राज्य सरकारकडून करण्यात येईल ;

(२) प्रत्येक सचिव हा, सभापतीच्या नियंत्रणास अधीन राहून, मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि मंडळात त्या त्या वेळी सेवा करणारे सर्व इतर अधिकारी व कर्मचारी हे त्याच्या अधीन असतील.

(३) सचिवास, मंडळाच्या सभांस हजर राहाण्याचा हक्क असेल, परंतु त्यास मत देण्याचा हक्क असणार नाही.

(४) प्रत्येक सचिवाने, विहित करण्यात येतील असे इतर अधिकार चालविले पाहिजेत व अशी इतर कर्तव्ये बजाविली पाहिजेत.

(५) राज्य सरकारास, राज्य मंडळाकरिता किंवा विभागीय मंडळाकरिता संबंधित (कोणतेही असल्यास) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या शिफारशीवरून एका किंवा एकाहून अधिक सह-सचिव किंवा सहायक सचिव नेमता येईल.

(६) सह-सचिवाने व सहायक सचिवाने, मंडळाच्या सामान्य किंवा विशेष आदेशान्वये सचिवाकडून त्यास, अनुक्रमे नेमून देण्यात येतील असे अधिकार चालविले पाहिजेत व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

(७) या अधिनियमान्वये नेमण्यात आलेले सचिव, सह-सचिव आणि सहायक सचिव हे, राज्य सरकारचे कर्मचारी असतील आणि त्यांना त्यांची वेतने व भत्ते हे राज्याच्या संचित निधीतून मिळ-[illegible] भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती ह्या, राज्य सरकारकडून ठरविण्यात

२२. (१) राज्य मंडळास, त्याची व विभागीय मंडळाची या अधिनियमाखालील कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी म्हणून आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करता येईल. मंडळांचे इतर अधिकारी व कर्मचारी.

(२) कलम (१) अन्वये राज्य मंडळाने नेमलेल्या अधिकाऱ्यांची वेतने व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या, ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमाद्वारे राज्य मंडळाकडून ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

२३. (१) राज्य मंडळ, पुढील नामोद्दिष्ट केलेल्या समित्यांची नेमणूक करील :— समित्यांची नेमणूक.

(अ) कार्यकारी परिषद.
(ब) विद्या परिषद.
(क) वित्त समिती.
(ड) परीक्षा समिती.
(इ) अभ्यास मंडळ किंवा मंडळे.

(२) राज्य मंडळास, त्याची कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा इतर समित्यांची नेमणूक करता येईल.

(३) प्रत्येक विभागीय मंडळ पुढील नामोद्दिष्ट केलेल्या समित्यांची नेमणूक करील :—

(अ) स्थायी समिती.
(ब) विद्या समिती.
(क) वित्त समिती.
(ड) परीक्षा समिती.
(इ) मान्यता समिती.

(४) विभागीय मंडळास, त्याची कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी विहित करण्यात येतील अशा इतर समित्यांची नेमणूक करता येईल.

(५) राज्य मंडळाने किंवा विभागीय मंडळाने नेमलेल्या प्रत्येक समितीची रचना, तिच्या सदस्यांच्या पदाची मुदत व तिने पार पाडावयाची कर्तव्ये व कामे, विहित करण्यात येतील अशी असतील.

२४. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीच्या सदस्यांमध्ये आकस्मिक रीत्या रिकाम्या झालेल्या सर्व जागा या, शक्य होईल तितक्या लवकर, यथास्थिति, निवडणूक करून किंवा नामनिर्दिष्ट करून किंवा नेमणूक करून किंवा नामोद्दिष्ट करून भरण्यात येतील ; आणि अशा आकस्मिक रीत्या रिकाम्या झालेल्या जागेवर निवडून आलेला, नामनिर्दिष्ट केलेला किंवा नेमलेला किंवा नामोद्दिष्ट केलेला इसम हा, तो ज्याच्या जागी निवडून आला असेल, नामनिर्दिष्ट करण्यात किंवा नेमण्यात किंवा नामोद्दिष्ट करण्यात आला असेल त्या सदस्याने, ती जागा रिकामी झाली नसती तर जितक्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते, तितक्याच मुदतीपर्यंत पद धारण करील. आकस्मिक रीत्या रिकाम्या झालेल्या जागा.

२५. राज्य मंडळाचे किंवा विभागीय मंडळाचे किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे अशा मंडळामध्ये किंवा समितीत कोणतीही जागा रिकामी होती किंवा अशा मंडळाच्या किंवा समितीच्या रचनेत दोष होता याच केवळ कारणावरून अवैध ठरणार नाही. जागा रिकाम्या झाल्यामुळे किंवा रचनेतील दोषामुळे कृत्य किंवा कामकाज अवैध न होणे.

राज्य मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व तो गुंतविणे.

२६. (१) राज्य मंडळाचा स्वत:चा असा एक निधी असेल, आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(अ) फी, स्वामित्व रकमा व मंडळाने बसविलेले आकार (विहित करण्यात आलेल्या शास्तींच्या रकमा धरून) ;

(ब) अनुदाने, अभिहस्तांकने, अंशदाने आणि मंडळास राज्य सरकारकडून देण्यात आलेली कर्जे, कोणतीही असल्यास ;

(क) मृत्यूपत्रदाने, देणग्या व दाने किंवा इतर अंशदाने, कोणतीही असल्यास ;

(ड) मंडळाकडे निहित असलेल्या कोणत्याही तारणपत्रावरील व्याज आणि त्याच्या विक्रीचे उत्पन्न ;

(इ) मंडळाकडे निहित असलेल्या मालमत्तेपासून मिळणारे सर्व भाडे आणि नफे ;

(फ) मंडळास किंवा त्याच्या वतीने मिळालेला सर्व पैसा.

(२) उक्त निधी, भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणेच्या कोणत्याही अनुसूचित बँकेत ठेवण्यात येईल किंवा राज्य मंडळाच्या विवेकानुसार, भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १८८२ अनुसार अधिकृत करण्यात आलेल्या तारणपत्रात गुंतविता येईल.

सभापती, सचिव, सह-सचिव आणि सहायक सचिव यांचे वेतन, निवृत्तीवेतन वगैरेबद्दलचा खर्च राज्य मंडळाने निधीतून देणे.

२७. राज्य मंडळ, मंडळाचे सभापती, सचिव, सह-सचिव आणि सहायक सचिव यांचे वेतन, निवृत्तीवेतन, रजेचे व इतर भत्ते यासाठी, राज्य सरकार ठरवील अशी रक्कम प्रतिवर्षी आपल्या निधीतून राज्य सरकारास देईल.

निधीचा सर्वसाधारण विनियोग.

२८. ह्या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, राज्य मंडळाच्या निधीचा विनियोग, ह्या अधिनियमात निर्दिष्ट केलेल्या बाबींशी आनुषंगिक असलेले आकार व खर्च देण्यासाठी आणि ह्या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळांना ज्या प्रयोजनांसाठी या अधिनियमान्वये किंवा तदनुसार अधिकार प्रदान करण्यात आले असतील व त्यांच्याकडे जी कर्तव्ये सोपविण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात आला पाहिजे.

निधीतून पैसा कसा काढावा.

२९. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या अधीन काम करणाऱ्या व या बाबतीत राज्य मंडळाकडून योग्य रीतीने अधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडून सही करण्यात आलेल्या धनादेशाद्वारे किंवा प्रत्ययपत्राद्वारे असेल त्याव्यतिरिक्त बँकेने राज्य मंडळाच्या निधीतून कोणतीही रक्कम देता कामा नये.

विभागीय मंडळास (रकमांचे) वार्षिक व इतर नियत वाटप.

३०. (१) राज्य मंडळाने ते ठरवील अशा रीतीने, प्रत्येक विभागीय मंडळास, प्रत्येक वर्षी उक्त मंडळाने निकटपूर्वीच्या वर्षात वसूल केलेल्या फीच्या, स्वामीत्व रकमेच्या आणि आकाराच्या एकूण रकमेच्या दोन-तृतीयांशाहून कमी नसेल इतकी रक्कम, ह्या अधिनियमान्वये किंवा तदनुसार विभागीय मंडळावर लादलेली कामे पार पाडण्यासाठी (रकमांचे) वार्षिक नियत वाटप म्हणून दिले पाहिजे.

(२) अशा वार्षिक नियत वाटपाशिवाय राज्य मंडळास, विभागीय मंडळास या अधिनियमाशी विसंगत नसतील अशी आपली कामे पार पाडण्यासाठी किंवा आपल्या अधिकारक्षेत्रातील कामे किंवा विकास योजना पूर्ण करण्यासाठी, राज्य मंडळास योग्य वाटतील अशा आणखी रकमा वळोवेळी देता येतील.

३१. (१) राज्य मंडळाने, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी, आणि अशा रीतीने उक्त मंडळाच्या पुढील वित्तीय वर्षाच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले पाहिजेत. वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

(२) प्रत्येक विभागीय मंडळाने विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी आणि अशा रीतीने, पुढील वित्तीय वर्षाच्या आपल्या उत्पन्नाचे व त्यास देण्यात यावयाच्या वार्षिक नियत वाटपाच्या रकमतून करण्यात येणाऱ्या खर्चाचे अर्थसंकल्पिय अंदाज तयार केले पाहिजेत.

(३) प्रत्येक विभागीय मंडळाने अशा रीतीने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजांवर विचारविनिमय केला पाहिजे आणि ते फेरफारासह किंवा फेरफाराशिवाय मान्य केले पाहिजे, आणि विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी, राज्य मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात त्यांचा समावेश करून राज्य सरकारकडे सादर करण्यासाठी म्हणून, उक्त अंदाज मान्य करण्यात आलेल्या स्वरूपात, राज्य मंडळाकडे पाठविले पाहिजेत.

(४) राज्य मंडळाने, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर, त्याने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजांवर (विभागीय मंडळाकडून आलेले अंदाज सोडून) विचारविनिमय केला पाहिजे आणि ते फेरफारासह किंवा फेरफाराशिवाय मान्य केले पाहिजेत आणि विभागीय मंडळांकडून मिळालेल्या अशा अंदाजांसह, ते मान्य करण्यात आलेल्या स्वरूपात राज्य सरकारकडे मंजुरीसाठी सादर केले पाहिजेत. राज्य सरकारास, राज्य मंडळाच्या आणि विभागीय मंडळांच्या अर्थसंकल्पीय अंदाजांच्या संबंधात, त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि उक्त आदेश राज्य मंडळास आणि संबंधित विभागीय मंडळांस कळविण्यात येतील आणि मंडळांनी अशा आदेशांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३२. राज्य मंडळाने, विभागीय मंडळांच्या हिशोबांचा समावेश करून जमा व खर्च यांचे वार्षिक हिशोब तयार केले पाहिजेत आणि हिशोब तपासणीसाठी ते राज्य सरकारकडे पाठविले पाहिजेत. राज्य सरकार हिशोबांची तपासणी करविण्याची व्यवस्था करील आणि राज्य मंडळ, हिशोब तपासणीसाठी उक्त सरकार ठरवील असे आकार देईल. वार्षिक हिशोब व हिशोब तपासणी.

३३. (१) राज्य मंडळाने व प्रत्येक विभागीय मंडळाने, राज्य सरकार पुरवण्यास सांगेल अशी, प्रतिवृत्ते, पत्रके आणि विवरणपत्रके आणि विभागीय मंडळाच्या कामाशी संबंध असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात राज्य सरकार मागणी करील अशी आणखी माहिती राज्य सरकारास पुरविली पाहिजे. मंडळांनी पुरवावयाची माहिती, पत्रके इत्यादी.

(२) असे कोणतेही प्रतिवृत्त, पत्रके किंवा विवरणपत्रके किंवा पुरविलेली माहिती विचारात घेतल्या-नंतर, राज्य सरकारास, ह्या अधिनियमाशी सुसंगत असणारे आवश्यक असतील असे निदेश देता येतील आणि यथास्थिति राज्य मंडळाने किंवा विभागीय मंडळाने अशा निदेशांचे पालन केले पाहिजे.

३४. (१) राज्य सरकारला, राज्य मंडळाने दिलेला सल्ला (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर कलम १८ च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश त्या मंडळास किंवा विभागीय मंडळास देण्याचा अधिकार असेल. संबंधित मंडळाने अशा निदेशांचे पालन केले पाहिजे. निदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

(२) तसेच राज्य सरकारला राज्य मंडळास किंवा कोणत्याही विभागीय मंडळास त्याने चाल-विलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात किंवा चालवीत असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात लिहिण्याचा आणि त्या बाबतीतील स्वतःची मते संबंधित मंडळास कळविण्याचा अधिकार असेल.

(३) संबंधित मंडळाने, कळविण्यात आलेल्या बाबीसंबंधात केलेली किंवा करण्याचे योजिलेली उपाययोजना, कोणतीही असल्यास, राज्य सरकारला कळविली पाहिजे आणि अशी उपाययोजना करण्यात जर त्यांनी कसूर केली असेल तर त्याबाबत स्पष्टीकरण दिले पाहिजे.

(४) जर अशा मंडळाकडून राज्य सरकारची खात्री होईल अशा रीतीने वाजवी मुदतीत उपाययोजना करण्यात आली नाही तर, राज्य सरकारास, मंडळाकडून देण्यात आलेले स्पष्टीकरण किंवा करण्यात आलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, अधिनियमाशी सुसंगत असणारे व त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील, आणि मंडळाने अशा निदेशांचे पालन केले पाहिजे.

(५) आणीबाणीच्या काळात तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे असे राज्य सरकारचे मत होईल तर, राज्य सरकारास, संबंधित मंडळाशी आगाऊ विचारविनिमय न करता या अधिनियमाशी सुसंगत असणारी त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करता येईल आणि त्याने केलेल्या उपाययोजनेबाबत मंडळास ताबडतोब कळविले पाहिजे.

(६) कोणत्याही मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही, अशा मंडळास या अधिनियमान्वये किंवा तदनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा अतिक्रम करून करण्यात आला आहे किंवा करण्यात आली आहे असे राज्य सरकारचे मत होईल तर, राज्य सरकारास, लेखी आदेशाद्वारे त्याबद्दलची कारणे निर्दिष्ट करून, कोणत्याही मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी तहकूब करता येईल आणि अशा मंडळाने जी उपाययोजना करण्याबद्दल आदेश दिला असेल किंवा तसा आदेश दिल्याचा अर्थ अभिप्रेत असेल अशी उपाययोजना करण्यास प्रतिबंध करता येईल.

(७) या कलमान्वये किंवा निकटपूर्ववर्ती कलमान्वये, राज्य सरकारने विभागीय मंडळास कोणताही निदेश आदेश दिला असेल किंवा इतर बाब कळविली असेल त्याबाबतीत किंवा विभागीय मंडळाने राज्य सरकारला कोणताही अहवाल, स्पष्टीकरण किंवा इतर बाब सादर केली असेल त्याबाबतीत, त्याची एक प्रत राज्य मंडळास पाठविली पाहिजे.

मंडळाकडे किंवा समितीकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

३५. या अधिनियमान्वये राज्य मंडळाने वापर करण्यासाठी त्यास प्रदान करण्यात आलेले जे अधिकार त्या मंडळाने विनियमाद्वारे विभागीय मंडळाकडे किंवा समितीकडे सोपविले असतील त्या अधिकारांचा वापर करण्यासंबंधीच्या सर्व बाबी त्या संस्थांकडे सोपविल्या जातील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, राज्य मंडळ, संबंधित बाबीसंबंधातील उक्त संस्थांचे प्रतिवृत्त स्वीकारील व त्यावर विचारविनिमय करील.

विनियम करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार.

३६. (१) राज्य मंडळास, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ विनियम करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, अशा विनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल:—

(अ) कलम २३ अन्वये नेमण्यात आलेल्या समित्यांची रचना, त्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(ब) अंतिम परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम;

(क) उमेदवारांस अंतिम परीक्षांना बसण्यास परवानगी देणे आणि अशा परवानगीसंबंधीच्या शर्ती;

(ड) कोणत्याही विषयात व सर्वंच परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी व कोणत्याही विषयात सूट, प्रशंसा व प्राविण्य मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण;

(इ) अंतिम परीक्षांसाठी प्रवेश फी व त्या परीक्षांच्या संबंधात असलेल्या इतर बाबींबाबत द्यावयाची इतर फी व आकार;

(फ) विभागीय मंडळांनी अंतिम परीक्षा घेण्याची व निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे;

(ग) परीक्षकांची नेमणूक, अंतिम परीक्षेसंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये व त्यांचे पारिश्रमिक;

(ह) परीक्षकांच्या पात्रता व अपात्रता;

(आय्) प्रमाणपत्रे देणे;

(ज) राज्य मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची राज्य मंडळाच्या व विभागीय मंडळांच्या कार्यालयात नेमणूक करणे व त्यांच्या सेवेच्या शर्ती;

(के) राज्य मंडळाच्या उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी भविष्य निर्वाह निधी उभारणे;

(ल) राज्य मंडळाच्या अर्थव्यवस्थेसंबंधातील सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे, त्याचे प्रशासन, अभिरक्षा व व्यवस्था ;

(म) मंडळांनी ज्या तारखेपूर्वी व ज्या रीतीने आपले अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले पाहिजेत ती तारीख व ती रीत;

(न) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला कोणताही विनियम, राज्य सरकारकडून त्यास मंजुरी मिळेपर्यंत अंमलात येणार नाही.

३७. निकटपूर्वीच्या कलमात काहीही असले तरी, प्राथमिक विनियम राज्य सरकारकडून करण्यात येतील आणि ते नवीन विनियम योग्य रीत्या तयार करण्यात येईपर्यंत व उक्त कलमान्वये त्यास मंजुरी मिळेपर्यंत, अंमलात राहतील. प्राथमिक विनियम करणे.

३८. राज्य मंडळास पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करण्यासाठी ह्या अधिनियमाशी व त्या अन्वये केलेल्या विनियमांशी सुसंगत असतील असे उपविधी करता येतील :— उपविधी करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार.

(अ) राज्य मंडळाच्या, आणि विभागीय मंडळाच्या व त्यापैकी कोणत्याही मंडळाने नेमलेल्या समित्यांच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यरीती व अशा सभांमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या ;

(ब) मंडळाच्या व त्यांनी नेमलेल्या समित्यांच्या सदस्यांना देता येईल असा भरपाई भत्ता;

(क) या अधिनियमात किंवा या अधिनियमान्वये केलेल्या विनियमात ज्याबाबत तरतूद केलेली नाही अशी केवळ मंडळांशी आणि त्यांच्या समित्यांशी संबंधित असलेली इतर कोणतीही बाब.

३९. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उपविधी यांच्या कोणत्याही उपबंधांच्या अर्थविवरणासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, ती बाब, निर्णयासाठी राज्य सरकारकडे पाठविता येईल ; मात्र मंडळाच्या सदस्यांपैकी निदान तीन सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब निर्णयासाठी राज्य सरकारकडे पाठविली पाहिजे. राज्य सरकारचा निर्णय अंतिम असेल. शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत अर्थविवरण.

४०. (१) नेमलेल्या दिवशी,— रद्द करणे व बचाव.

(अ) मुंबई माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अधिनियम, १९४८ ; आणि

(ब) मध्य प्रदेश माध्यमिक शिक्षण अधिनियम, १९५१,

हे रद्द होतील ; आणि त्या अन्वये रचना केलेले महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळ आणि विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळ (ज्यांचा यापुढे या कलमात "विघटित मंडळे" म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) विघटित होईल आणि उक्त मंडळाच्या सर्व सदस्यांची पद रिकामी होतील.

(२) उक्त अधिनियम रद्द करण्यात आले असले तरीही—

(अ) विघटित मंडळांची सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क, कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार हे, नेमलेल्या दिवशी, राज्य मंडळाकडे हस्तांतरित होतील आणि त्यांचे आणखी हस्तांतरण न करता ते, राज्य मंडळाकडे निहित होतील आणि त्यानंतर ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी राज्य मंडळाची रचना करण्यात आली असेल त्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी त्यांचा विनियोग करण्यात येईल ;

(ब) विघटित मंडळांनी स्वीकारलेली किंवा त्यांना मिळालेली कोणतीही पूर्तदाने ही, या अधिनियमान्वये राज्य मंडळाकडून स्वीकारण्यात आली असल्याचे किंवा ती त्यास मिळाली असल्याचे समजण्यात येईल, आणि ज्या शर्तींवर पूर्तदाने स्वीकारण्यात आली असतील किंवा मिळाली असतील त्या सर्व शर्ती, या अधिनियमातील उपबंधांशी त्या सुसंगत नसल्या तरीही, ह्या अधिनियमान्वये वैध असल्याचे समजण्यात येईल ;

(क) विघटित मंडळाच्या नावे केलेले कोणतेही मृत्युपत्रदान, देणगी, अटी किंवा विश्वस्त व्यवस्था यांचा ज्यात समावेश आहे असे, नेमलेल्या दिवसापूर्वी, करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर लेख यामध्ये, नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून, विघटित मंडळाऐवजी राज्य मंडळाचे नाव दाखल करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल ;

(ड) नेमलेल्या दिवसापूर्वी, ज्यांना मान्यता दिलेली असेल व विघटित मंडळाचे विशेषाधिकार ज्यांना प्रदान करण्यात आले असतील अशा सर्व संस्था ह्या, अशी मान्यता किंवा असे विशेषाधिकार हे, या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा तदनुसार, ज्या मर्यादेपर्यंत परत घेण्यात, निर्बंधित करण्यात किंवा त्यात फेरफार करण्यात येतील त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या तत्सम विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या व त्यांचे विशेषाधिकार प्रदान करण्यात आलेल्या संस्था असल्याचे समजण्यात येईल ;

(इ) नेमलेल्या दिवसापूर्वी पत्करण्यात आलेली आणि कोणत्याही विघटित मंडळाच्या नावे वैधरीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व बोजे यांची फेड व पूर्तता राज्य मंडळाकडून करण्यात येईल ;

(फ) विघटित मंडळासंबंधी कोणत्याही अधिनियमात किंवा अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या इतर लेखामध्ये असलेले सर्व उल्लेख हे यथास्थिति, राज्यमंडळ किंवा तत्सम विभागीय मंडळ याबाबतचे उल्लेख असल्याचे समजण्यात येईल ;

(ग) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाच्या सेवेत असलेले राज्य सरकारचे सर्व अधिकारी व कर्मचारी (वर्ग एक व वर्ग दोनच्या अधिकाऱ्यां-व्यतिरिक्त ) हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, उक्त तारखेपासून, राज्य मंडळाच्या सेवेत घेण्यात येतील व त्यांची नेमणूक करण्यात येईल. आणि त्यांना सामावून घेण्याच्या व त्यांच्या वरिष्ठतेच्या संबंधात राज्य सरकारने काढलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, ते बदललेल्या परिस्थितीनुसार त्यांच्या त्याच सेवेच्या शर्तींवर या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकारी अशा शर्तींमध्ये योग्य रीत्या फेरबदल करीपर्यंत, आपले पद धारण करण्याचे चालू ठेवतील :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या संबंधात, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी लागू असणाऱ्या सेवेच्या शर्तींमध्ये, राज्य सरकारची पूर्वसंमती घेतल्याशिवाय त्याचे नुकसान होईल अशा रीतीने फेरबदल करता कामा नये :

तसेच, अशा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने राज्य सरकारकडे केलेली कोणतीही सेवा ही, राज्य मंडळाकडे केलेली सेवा असल्याचे समजण्यात येईल.

या परिच्छेदाच्या पूर्ववर्ती उपबंधांमधील कोणतीही गोष्ट राज्य मंडळाने आपल्या सेवेत घ्यावयाच्या किंवा घेतलेल्या आणि ज्याने नेमलेल्या दिवशी किंवा राज्य सरकार ठरवील अशा नंतरच्या तारखेस राज्य सरकारला लेखी नोटिशीद्वारे त्या मंडळाचा अधिकारी किंवा कर्मचारी होण्याची किंवा चालू राहण्याची आपली इच्छा नसल्याचे कळविले असेल अशा कोणत्याही अधि-काऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास लागू होणार नाही ; व त्यानंतर त्यास सरकारी सेवेतून निवृत्त होण्यास परवानगी देण्यात येईल, तसेच त्यास भरपाई, निवृत्तिवेतन, उपदान किंवा राज्य सरकार ठरवील असे त्यासारखे सेवासमाप्तीचे इतर फायदे मिळण्याचा हक्क असेल (असे सेवासमाप्तीचे फायदे हे, नेमलेल्या दिवशी त्याची राज्य सरकारकडील सेवा समाप्त झाल्यानंतर त्यास जे फायदे मिळाले असते त्या फायद्यांहून कमी लाभदायक असता कामा नये ;

(ह) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळाने योग्य रीत्या नेमलेले व त्यांच्या सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी हे, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य मंडळाने नेमलेल्या दिवशी नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी असल्याचे समजण्यात येईल, आणि त्यांना सामावून घेण्याच्या व त्यांच्या वरिष्ठतेच्या संबंधात राज्य सरकारने काढलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून ते, बदललेल्या परिस्थितीनुसार त्यांच्या सेवेच्या शर्तींवर या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकारी अशा शर्तींमध्ये फेरबदल करीपर्यंत आपले पद धारण करण्याचे चालू ठेवतील :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी लागू असणाऱ्या सेवेच्या शर्तीमध्ये, राज्य सरकारची पूर्वसंमती घेतल्याशिवाय, त्याचे नुकसान होईल अशा रीतीने फेरबदल करता कामा नये :

तसेच, अशा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने राज्य सरकारकडे केलेली कोणतीही सेवा ही, राज्य मंडळाकडे केलेली सेवा असल्याचे समजण्यात येईल.

४१. दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांची उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभामध्ये उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत आणि त्या रीतीने याद्वारे दुरुस्ती करण्यात येत आहे. विवक्षित अधिनियमांची दुरुस्ती.

४२. ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या कामात जर कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य सरकारला, उक्त अडचण दूर करण्यासाठी म्हणून आवश्यक किंवा इष्ट वाटेल आणि अशा उपबंधाशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे, करण्याचा अधिकार आहे : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांची मुदत समाप्त झाल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढता कामा नये.

## पहिली अनुसूची

[कलम २ चे खंड (इ) आणि (न) पहा.]

### १. पुणे विभाग

| | |
|---|---|
| (१) बृहन्मुंबई.<br>(२) धुळे जिल्हा.<br>(३) जळगांव जिल्हा.<br>(४) कुलाबा जिल्हा.<br>(५) नाशिक जिल्हा.<br>(६) रत्नागिरी जिल्हा.<br>(७) ठाणे जिल्हा. | मुंबई महसूल विभाग. |
| (८) अहमदनगर जिल्हा.<br>(९) कोल्हापूर जिल्हा.<br>(१०) पुणे जिल्हा.<br>(११) सांगली जिल्हा.<br>(१२) सातारा जिल्हा.<br>(१३) सोलापूर जिल्हा. | पुणे महसूल विभाग. |

### २. नागपूर विभाग

| | |
|---|---|
| (१) अकोला जिल्हा.<br>(२) अमरावती जिल्हा.<br>(३) भंडारा जिल्हा.<br>(४) बुलढाणा जिल्हा.<br>(५) चांदा जिल्हा.<br>(६) राजुरा जिल्हा.<br>(७) नागपूर जिल्हा.<br>(८) यवतमाळ जिल्हा.<br>(९) वर्धा जिल्हा. | नागपूर महसूल विभाग. |

### ३. औरंगाबाद विभाग

| | |
|---|---|
| (१) औरंगाबाद जिल्हा.<br>(२) बीड जिल्हा.<br>(३) नांदेड जिल्हा.<br>(४) उस्मानाबाद जिल्हा.<br>(५) परभणी जिल्हा. | औरंगाबाद महसूल विभाग. |

## दुसरी अनुसूची

(कलम ४१ पहा)

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | दुरुस्त्यांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९४८ | २० | पुणे विद्यापीठ अधिनियम, १९४८ | १. कलम १६, पोट-कलम (१) मध्ये "**वर्ग १—पदसिद्ध सदस्य.**" या शीर्षकाखालील परिच्छेद (ब) मध्ये, खंड (तीन-अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(तीन-अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती,".<br>२. कलम २१, पोट-कलम (१) मधील, "**वर्ग १—पदसिद्ध.**" या शीर्षकाखालील खंड (दोन-अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(दोन-अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती,".<br>३. कलम ४१, खंड (एक) मध्ये, "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—<br>"किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली कोणतीही परीक्षा,". |

अनुसूची २—चालू

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | दुरुस्त्यांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९४९ .. | ५१ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९. | १. कलम १५, पोट-कलम (१) मधील **"वर्ग १—पदसिद्ध सदस्य."** या शीर्षकाखालील, परिच्छेद (ब) मध्ये, खंड (दोन-अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(दोन-अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती,".<br>२. कलम ३४, खंड (एक) मध्ये, "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा", या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—<br>", किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५, अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली कोणतीही परीक्षा,". |
| १९५३ .. | ३१ | मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९५३. | १. कलम १६, पोट-कलम (१) मधील, **"१—पदसिद्ध अधिछात्र"** ह्या शीर्षकाखाली परिच्छेद (ब) मध्ये खंड (बारा) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(बारा) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती,".<br>२. कलम २६, पोट-कलम (१) मध्ये, खंड (३-अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(३-अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती,". |

अनुसूची २—चालू

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | दुरुस्त्यांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९५३—चालू | | | ३. कलम ३८, खंड (दोन) मध्ये, "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल:— ", किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली कोणतीही परीक्षा,". |
| १९५८ .. | ३९ | मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९५८. | १. कलम १६, पोट-कलम (१) मध्ये, "१—पदसिद्ध सदस्य." या शीर्षकाखालील परिच्छेद (ब) मध्ये, खंड (पाच) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल:— "(पाच) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती.". <br> २. कलम २१, पोट-कलम (१) मध्ये खंड (२-अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— "(२-अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती.". <br> ३. कलम ४२, खंड (एक) मध्ये, "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :— ",किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली कोणतीही परीक्षा,". |

अनुसूची २—चालू

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | दुरुस्त्यांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९६२ .. | २८ .. | शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९६२. | १. कलम १७, पोट-कलम (१) मध्ये, " वर्ग १–पदसिद्ध सदस्य." या शीर्षकाखालील परिच्छेद (ब) मध्ये खंड (सहा) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— "(सहा) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती. ". <br><br> २. कलम २२, पोट-कलम (१), खंड (सहा) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— "(सहा) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती. ". <br><br> ३. कलम ४३, खंड (एक) मध्ये, " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :— ", किंवा महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये, स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली कोणतीही परीक्षा, ". |
| १९६४ | .. २२ | .. नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९६३. | १. कलम १६, पोट-कलम (१) मध्ये "वर्ग १–पदसिद्ध सदस्य." या शीर्षकाखालील परिच्छेद (ब) मध्ये, खंड (सात) आणि (आठ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— " (सात) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती. ". |

अनुसूची २—समाप्त

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | दुरुस्त्यांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९६४—चालू | | | २. कलम १९, पोट-कलम (१) मध्ये, खंड (तीन) ऐवजीं पुढील खंड दाखल करण्यात येईल :— " (तीन) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती.". <br> ३. कलम २१, पोट-कलम (१) मध्ये, खंड (सहा) आणि (सात) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— " (सहा) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सभापती किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला विभागीय मंडळाचा सभापती. ". <br> ४. कलम ४१ मध्ये,— (अ) खंड (तीन) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— "(तीन-अ) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये, स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने, परिनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा विषयात आणि अशा प्रमाणात गुण संपादन करून घेतलेली कोणतीही परीक्षा, किंवा "; <br> (ब) खंड (पाच) मध्ये, "(तीन)" ह्या मजकुरानंतर, "(तीन-अ)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |

(यथार्थ अनुवाद)

वा. ना. पंडित,

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.

## MAHARASHTRA ACT No. XLII OF 1965.

## THE BOMBAY HIGHWAYS (EXTENSION AND AMENDMENT) ACT, 1965.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २५ सप्टेंबर १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे ती याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLII OF 1965.

AN ACT TO EXTEND THE BOMBAY HIGHWAYS ACT, 1955, TO THE REST OF THE STATE OF MAHARASHTRA, AND FOR THAT AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THAT ACT.

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ७ ऑक्टोबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ हा महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित भागास लागू करणे आणि त्या व इतर विवक्षित कारणांसाठी त्या अधिनियमात आणखी दुरुस्ती करणे याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात अंमलात असलेला मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ हा राज्याच्या उर्वरित भागास लागू करणे आणि त्या व यापुढे दिलेल्या इतर विवक्षित कारणांसाठी त्या अधिनियमात आणखी दुरुस्ती करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास मुंबई महामार्ग (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६५ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५, आणि तदन्वये केलेले व महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात अंमलात असलेले नियम हे, याद्वारे त्या राज्याच्या उर्वरित भागास लागू करण्यात येत आहेत. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ हा महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित

सन १९५५चा मुंबई अधि- नियम क्रमांक ५५ याच्या कलम १ ची दुरुस्ती.

३. कलम २ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू केलेला मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ (ज्याचा यापुढे "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे) याच्या कलम १ मध्ये,—

(अ) पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.";

(ब) पोट-कलम (३) मध्ये "हे कलम तावडतोब अंमलात येईल" या मजकुराऐवजी "हे कलम संपूर्ण राज्यात अंमलात असेल." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५५चा मुंबई अधि- नियम क्रमांक ५५ याच्या कलम २ ची दुरुस्ती.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मधील खंड (आय्) मध्ये,—

"ज्यावरून लोकांना जाण्यायेण्याचा हक्क असेल किंवा ज्यावर जाण्याचा लोकांना हक्क देण्यात आलेला आहे व" हा मजकूर वगळण्यात येईल. "जाहीर करण्यात आले आहे" या मजकुरानंतर "असा रस्ता, मार्ग किंवा जमीन" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५५चा मुंबई अधि- नियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ ची दुरुस्ती.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात" हे शब्द जेथे प्रथम आले आहेत तेथे त्याऐवजी "राज्यात" हा शब्द व दुसऱ्या वेळी आले आहेत तेथे त्याऐवजी "त्यात" हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन १९५५चा मुंबई अधि- नियम क्रमांक ५५ याच्या कलम ७ ची दुरुस्ती.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) हा अधिनियमाचे उपबंध ज्या कोणत्याही प्रदेशात अंमलात आणले असतील त्या प्रदेशात, आणि—

(एक) कलम ३ अन्वये कोणताही रस्ता, मार्ग किंवा जमीन ही, महामार्ग असल्याचे जाहीर करण्यात आले असेल, किंवा महामार्ग बांधण्याचे किंवा त्याचा विकास करण्याचे काम हाती घेण्यात आले असेल किंवा हाती घेण्याचे योजिले असेल तेव्हा, आणि

(दोन) अशा महामार्गाच्या संबंधात महामार्गाची हद्द, इमारत रेषा किंवा नियंत्रण रेषा निश्चित करणे आवश्यक आहे असे राज्य सरकारास वाटत असेल तेव्हा, राज्य सरकारास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा महामार्गाच्या संबंधात महामार्गाची हद्द, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा निश्चित करता येईल :

परंतु, एखाद्या महामार्गाचे ठिकाण किंवा त्याच्या आवश्यक त्या बाबी किंवा ज्या स्थानिक क्षेत्रातून महामार्ग जातो त्या स्थानिक क्षेत्राची स्थिती लक्षात घेऊन, राज्य सरकारने, कोणत्याही महामार्गाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात, निरनिराळ्या इमारत किंवा नियंत्रण रेषा निश्चित करणे हे विधिसंमत असेल.";

(२) पोट-कलम (२) मध्ये, "तालुक्याच्या किंवा महालाच्या" या मजकुराऐवजी "तालुक्याच्या, तहसिलाच्या किंवा महालाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये, पोट-कलम (१) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५५चा मुंबई अधि-नियम क्रमांक ५५ याच्या कलम २८ ची दुरुस्ती.

"परंतु, राज्य सरकार, सामान्य आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक असेल अशी नुकसानभरपाईची रक्कम देणारा कोणताही निवाडा, राज्य सरकारच्या किंवा ह्याबाबतीत राज्य सरकार नेमील अशा अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय देता कामा नये.".

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये,— सन १९५५चा मुंबई अधि-नियम क्रमांक ५५ याच्या कलम ४९ ची दुरुस्ती.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "केलेल्या अडथळ्यामुळे" या मजकुरानंतर "किंवा अशा इसमांचे लक्ष विचलित झाल्यामुळे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (५) मध्ये, "अडथळा येतो" ह्या मजकुरानंतर "किंवा लक्ष विचलित होते" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(क) उक्त कलम ४९ याच्या समास टीपेऐवजी पुढील समास टीप दाखल करण्यात येईल :—

"कोणताही महामार्ग वापरणाऱ्या इसमांना पुढचे दिसण्यास अडथळा, वगैरे येण्यामुळे उद्भवणाऱ्या धोक्यास प्रतिबंध.".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ६४ मध्ये, "अधिनियम, १८७९" या मजकुरानंतर, "किंवा राज्याच्या कोणत्याही भागात जमीन महसुलासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही विधी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९५५चा मुंबई अधि-नियम क्रमांक ५५ याच्या कलम ६४ ची दुरुस्ती.

१०. मुख्य अधिनियमाचे कलम ६५ यात,— सन १९५५चा मुंबई अधि-नियम क्रमांक ५५ याच्या कलम ६५ची दुरुस्ती.

(अ) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) "अधिनियम, १८७९" या मजकुरानंतर "किंवा राज्याच्या कोणत्याही भागात, जमीन महसुलासंबंधी अंमलात असलेला विधी" हा मजकूर, आणि "किंवा अधिनियमात" या मजकुरानंतर "किंवा विधीत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जेव्हा अशा कोणत्याही विधीत संक्षिप्त रीत्या चौकशी करण्याबाबत कोणतीही तरतूद केलेली नसेल तेव्हा अशी चौकशी, त्या विधीत तरतूद केलेली असेल अशा इतर रीतीने करण्यात आली पाहिजे.";

(ब) पोट-कलम (२) मध्ये, "अधिनियम, १८७९" या मजकुरानंतर, "किंवा राज्याच्या कोणत्याही भागात, जमीन महसुलासंबंधी अंमलात असलेला विधी" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

११. मुख्य अधिनियमाचे कलम ७१ याच्या पोट-कलम (२) मध्ये,— सन १९५५चा मुंबई अधि-नियम क्रमांक ५५ याच्या कलम ७१ची दुरुस्ती.

(अ) खंड (अ) मध्ये, "तालुक्याच्या किंवा महालाच्या" या मजकुराऐवजी, "तालुक्याच्या, तहसिलाच्या किंवा महालाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (के) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"(के) महामार्ग वापरणाऱ्या इसमांना पुढे दिसणार नाही अशा रीतीने अडथळा केल्यामुळे किंवा त्यांचे लक्ष विचलित झाल्यामुळे उद्भवणाऱ्या धोक्यास प्रतिबंध करणे, व जनतेस होणारा त्रास, धोका किंवा इजा ह्यांना प्रतिबंध करणे ;".

सन १९५५चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ७२ ची दुरुस्ती.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ७२ मध्ये, अखेरच्या स्पष्टीकरणाऐवजी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येईल :—

"स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता, मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ किंवा मध्य प्रदेश वैधानिक संस्था (प्रादेशिक रचना) अधिनियम, १९५६, व मध्य प्रदेश गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९५० ह्या अन्वये स्थापन करण्यात आलेले विदर्भ गृहनिर्माण मंडळ हे, स्थानिक प्राधिकारी संस्था आहे असे समजण्यात आले पाहिजे.".

सन १९५५चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ७४ ची दुरुस्ती.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ च्या परंतुकामध्ये,—

(अ) "किंवा न करणे" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ब) "निश्चित करणे" ह्या मजकुरानंतर "किंवा अशा महामार्गाच्या बांधकामामुळे किंवा नियोजित बांधकामामुळे ज्या जमिनींची किंमत वाढली असेल त्या जमिनींवर कलम ४२ अन्वये सुधारणा आकार बसविणे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) "योग्य त्या फेरफारांसह लागू होतील." ह्या मजकुराऐवजी "किंवा यथास्थिति, सुधारणा आकार बसविण्यासंबंधीचे ह्या अधिनियमाचे उपबंध, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील." हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ड) समास टीपेमध्ये शेवटी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"आणि सुधारणा आकार बसविणे.".

सन १९५५चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ यात नवीन कलम ७५ समाविष्ट करणे.

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ नंतर, पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :—

रद्द करणे व बचाव.

"७५. (१) मुंबई महामार्ग (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६५ हा अंमलात आल्यानंतर, मध्यप्रांत आणि वऱ्हाड जमीन-उपयोग नियमन अधिनियम, १९४८ हा रद्द होईल :

परंतु, उपरोक्त अधिनियमान्वये (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेली अनुज्ञप्ती, ठेवलेले आराखडे, किंवा लादलेले निर्बंध, केलेले अर्ज आणि नियम, दिलेल्या परवानग्या, किंवा दिलेली नुकसानभरपाई यांचा समावेश करून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, ह्या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा केलेली कार्यवाही आहे असे समजले पाहिजे, आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही कारवाईद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यात येईपर्यंत, त्याचप्रमाणे अंमलात राहील.

(२) या कलमात विशिष्ट बाबी नमूद करण्यात आल्यामुळे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलम ७ (हे कलम, अधिनियम रद्द करण्यात आल्यामुळे होणाऱ्या परिणामासंबंधीचे आहे.) याचे उपबंध प्रस्तुत अधिनियमास सर्वसामान्यपणे लागू होण्यास बाध येणार नाही.".

(यथार्थ अनुवाद)

मा. ना. पंडित,

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.

## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 1965.

### THE WAKF (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1965.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १५ ऑक्टोबर १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 1965.

### AN ACT TO AMEND THE WAKF ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

### सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २६ ऑक्टोबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.

**महाराष्ट्र राज्यास लागू असलेला वक्फ अधिनियम, १९५४ यात दुरुस्ती करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यास लागू असलेला वक्फ अधिनियम, १९५४ यात, यापुढे दिलेल्या कारणांसाठी दुरुस्ती करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास वक्फ (महाराष्ट्र दुरुस्ती) अधिनियम, १९६५, असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. महाराष्ट्र राज्यास लागू असलेला वक्फ अधिनियम, १९५४ (ज्याचा यात यापुढे "मुख्य अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम १० मध्ये पोट-कलम (२) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :— सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १०ची दुरुस्ती.

"(२) मंडळाचा एक सभापती असेल व तो, राज्य सरकारकडून, कलम ११ अन्वये नेमण्यात आलेल्या सदस्यांमधून, नामनिर्दिष्ट करण्यात येईल.".

सन १९५४चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६३ची दुरुस्ती.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये,—

(अ) "राज्य सरकारास" या मजकुराऐवजी, "राज्य सरकारास किंवा राज्य सरकारने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "राज्य सरकारास" या मजकुरानंतर, "किंवा अधिकाऱ्यास" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल; आणि

(क) समास टीपेत, "राज्य सरकारने" या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"राज्य सरकारने किंवा अधिकाऱ्याने".

सन १९५४चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६७ ची दुरुस्ती.

४. मुख्य अधिनियमाचे कलम ६७, पोट-कलम (२), खंड (ह) मध्ये, "मंडळाकडून सादर करण्यात येईल" या मजकुरानंतर, "आणि राज्य सरकारकडून मान्य करण्यात येईल" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

वा. ना. पंडित,

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.